# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 17 February 2026

Time 7.10 AM to 7.20 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक १७ फेब्रुवारी २०२६ सकाळी ७.१० मि.**

****

- पंतप्रधान नरेंद्र मोदी आज मुंबई दौऱ्यावर–फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युअल मॅक्राँ यांच्यासोबत विविध कार्यक्रमांमध्ये सहभाग
- देशातल्या पहिल्या हवामान परिषदेचं आजपासून मुंबईत आयोजन
- ऊस उत्पादकांच्या एफआरपीसाठी साखर कारखान्यांकडून १० कोटी रुपयांची बँक गॅरंटी
- सीबीएसईच्या दहावी तसंच बारावीच्या परीक्षांना आजपासून प्रारंभ

आणि

- बारावी परीक्षेत कॉपी प्रकरणी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात १८ जण निलंबित तर नांदेड इथं परीक्षा केंद्राला कारणे दाखवा नोटीस

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज मुंबई दौऱ्यावर येणार आहेत. फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युअल मॅक्राँ काल तीन दिवसांच्या भारत दौऱ्यासाठी मुंबईत दाखल झाले. या दोन्ही नेत्यांची आज मुंबईत लोकभवन इथं भेट होणार आहे. उभय देशातल्या धोरणात्मक भागीदारीचा आढावा ते यावेळी घेतील. त्यानंतर भारत–फ्रान्स नवेन्मेष वर्ष २०२६ या कार्यक्रमाचं मोदी आणि मॅक्राँ संयुक्तपणे उद्धाटन करतील. दोन्ही देशातले मोठे व्यावसायिक, उद्योगपती, संशोधक, आणि नवोन्मेषकर्मी या कार्यक्रमात भाग घेणार आहेत. नवी दिल्लीत सुरू असलेल्या एआय इम्पॅक्ट परिषदेचं आमंत्रण पंतप्रधानांनी इमॅन्युअल मॅक्राँ यांना दिलं आहे.

दरम्यान, एआय इम्पॅक्ट समिट २०२६चं काल पंतप्रधानांच्या हस्ते औपचारिक उद्घाटन झालं. त्यापूर्वी त्यांनी भारत मंडपम इथं विविध कंपन्या आणि संस्थांनी

उभारलेल्या स्टॉलची पाहणी केली आणि त्यांचं तंत्रज्ञान जाणून घेतलं. या परिषदेत सहभागी होण्यासाठी शंभर पेक्षा जास्त देशांना आमंत्रित करण्यात आलं आहे.

****

देशातल्या पहिल्या हवामान परिषदेला आजपासून मुंबईतल्या वांद्रे कुर्ला संकुलात जिओ वर्ल्डमध्ये सुरुवात होणार आहे. तीन दिवस चालणाऱ्या या परिषदेसाठी देशाचे दोन अंतराळवीर राकेश शर्मा आणि शुभांशु शुक्ला एकाच मंचावर येणार आहेत. क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर यांच्या हस्ते या दोन्ही अंतराळवीरांचा सत्कार करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला विविध सामाजिक संस्था, सामाजिक क्षेत्रातले नेते, उद्योग क्षेत्रातले शाश्वततातज्ञ एकत्रित येणार असून, भारत आणि ग्लोबल साऊथसाठी हवामानविषयक उपायांवर चर्चा करणार आहेत.

****

देशभरातला नक्षलवाद मार्चअखेरीस संपुष्टात येईल, असा विश्वास केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी व्यक्त केला. काल नवी दिल्ली इथं दिल्ली पोलीस दलाच्या ७९ व्या स्थापना दिनानिमित्त झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. ११ राज्यांमधला नक्षलवाद हा नेहमीच देशाच्या अंतर्गत सुरक्षेसाठी एक मोठं आव्हान होता, मात्र लवकरच तो पूर्णपणे संपुष्टात येईल, असं शहा यांनी नमूद केलं. ते म्हणाले...

**बाईट– केंद्रीय गृहमंत्री अमित शहा**

****

राज्य अल्पसंख्यांक विकास विभागाने ७५ शाळांना अल्पसंख्याक दर्जा बहाल करण्याच्या प्रमाणपत्र वाटपाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्थगिती दिली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाबद्दल राज्यात शासकीय दुखवटा असतानाच्या काळात ही प्रमाणपत्रे जारी करण्यात आल्यानं या प्रक्रियेवर आक्षेप घेतला जात आहे. उच्चस्तरीय अधिकाऱ्यांकडून या प्रकरणाची चौकशी व्हावी तसंच दोषींवर कडक कारवाई करावी असे आदेश फडणवीस यांनी दिले आहेत.

या प्रकरणांची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री तथा अल्पसंख्याक विकास मंत्री सुनेत्रा पवार यांनी दिले.

****

ऊस उत्पादक शेतकऱ्यांना रास्त आणि किफायतशीर दर–एफआरपीची रक्कम विहित मुदतीत देणं साखर कारखानदारांना बंधनकारक करण्यात आलं आहे. यासाठी सरकार साखर कारखानदारांकडून १० कोटी रुपये बँक गॅरंटी घेणार आहे.

एफआरपीची रक्कम विहित मुदतीत दिली नाही, तर या बँक गॅरंटीतून ती रक्कम विलंब व्याजासह उस उत्पादकांना दिली जाणार आहे. जे कारखाने विहित मुदतीत रक्कम देतील त्यांना गाळप हंगामानंतर बँक गॅरंटीची रक्कम परत केली जाणार आहे. दरम्यान, एफआरपीची सुमारे ६० टक्क्यापेक्षा कमी रक्कम दिलेल्या ४५ साखर कारखान्यांना साखर आयुक्त डॉ. संजय कोलते यांनी नोटिसा बजावल्या आहेत. त्यांची सुनावणी, आयुक्तालयात आज आणि उद्या होणार आहे.

****

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष पदाच्या निवडीसाठी येत्या २६ फेब्रुवारीला पक्षाच्या कार्यकारिणीची बैठक बोलावण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या निवासस्थानी झालेल्या आमदारांच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

****

बालकांचा मोफत सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम आरटीई अंतर्गत २०२६-२७ या वर्षासाठीच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेला आजपासून सुरूवात होत आहे. प्राथमिक विभागाचे शालेय शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी ही माहिती दिली. ही प्रवेश प्रक्रिया १० मार्च पर्यंत चालणार आहे.

****

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ-सीबीएसईच्या दहावी तसंच बारावीच्या परीक्षांना आजपासून प्रारंभ होत आहे. सकाळी साडे दहा ते दुपारी दीड या वेळेत निर्धारित परीक्षा केंद्रांवर या परीक्षा होणार आहेत. दहावीच्या परीक्षा १० मार्चला, तर बारावीच्या परीक्षा नऊ एप्रिलला संपतील. दहावीच्या सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांना विज्ञान, गणित, सामाजिक विज्ञान आणि भाषा या पैकी कोणत्याही विषयात गुणवत्ता सुधारण्याची दुसऱ्यांदा परीक्षा देता येईल, मात्र संबंधित विद्यार्थ्याने पहिल्या परीक्षेत किमान तीन विषयांची परीक्षा देणं बंधनकारक असल्याचं, सीबीएसईकडून सांगण्यात आलं आहे.

****

राज्य शिक्षण मंडळाच्या बारावी परीक्षेदरम्यान छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात कन्नड तालुक्यातल्या जैतपूर इथल्या कॉपी प्रकरणी १८ जणांना निलंबित करण्यात आलं आहे. सखोल चौकशीअंती सीसीटीव्ही फुटेज तसंच अधिकृत अहवालांच्या आधारे संबंधित परीक्षा केंद्रावरील शिक्षक आणि सेवकांनी परीक्षा नियमांचं उल्लंघन केल्याचं स्पष्ट झालं, त्यानंतर ही कारवाई करण्यात आली.

**

नांदेड जिल्ह्याच्या कंधार तालुक्यात अंबुलगा इथल्या माणिक प्रभु उच्च माध्यमिक विद्यालयातल्या परीक्षा केंद्राला अनियमिततेप्रकरणी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी काल या केंद्राला अचानक भेट दिली. यावेळी विविध गंभीर त्रुटी आढळून आल्या. या अनियमिततेसंदर्भात कारणे दाखवा नोटीशीस, हे केंद्र रद्द करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देशही कर्डिले यांनी दिले.

दरम्यान, नांदेड जिल्ह्यातल्या विविध परीक्षा केंद्रावरील सात विद्यार्थ्यांवर कॉपी केल्या प्रकरणी नियमांनुसार कारवाई करण्यात आली असून, संबंधित केंद्रसंचालक आणि बैठे पथकांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

****

हरियाणात फरीदाबाद इथं नुकत्याच झालेल्या सुरजकुंड मेळाव्यात परभणी जिल्ह्यातल्या शिखा अजमेरा यांच्या शिखाज कारिगरी या अनोख्या वस्त्रांचं सादरीकरण झालं. भारतातील वेगवेगळ्या चित्रशैली कपड्यावर उतवरल्या आहेत. शिखा यांनी आपल्या या शैलीबाबत माहिती दिली. त्या म्हणाल्या...

**बाईट–शिखा अजमेरा**

छत्रपती संभाजीनगर इथला महिला–नेतृत्व संचलित हा उपक्रम भारत सरकारच्या 'वन डिस्ट्रिक्ट वन प्रॉडक्ट' योजनेचा अधिकृत भागीदार असून, वस्त्र मंत्रालयाच्या 'India Handmade' मंचाशी संलग्न आहे. सध्या सुमारे शंभरहून अधिक सन्मानित कारागीर आणि कलाकार या उपक्रमाशी जोडलेले आहेत.

****

धाराशिव जिल्ह्यात संपूर्णता अभियानाच्या दुसऱ्या टप्प्याला कालपासून सुरूवात झाली. जिल्ह्यातले सर्व विभाग कर्मचारी, आशा स्वयंसेविका, अंगणवाडी कार्यकर्त्यांनी या टप्प्यात काम करण्याचं आवाहन जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी केलं. या अभियानाच्या पहिल्या टप्प्यात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या विभाग प्रमुखांना यावेळी जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते गौरवण्यात आलं.

****

लातूरच्या पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतनसमोर विद्यार्थ्यांच्या दोन गटात झालेल्या हाणामारीत एका विद्यार्थ्याचा मृत्यू झाला, तर तीन जण जखमी झाले. रविवारी सायंकाळी ही घटना घडली. विक्रम पांचाळ असं मृत विद्यार्थ्याचं नाव

आहे. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी श्रीधर पाटील याच्यासह तीन अल्पवयीन संशयितांना ताब्यात घेतलं आहे. महाविद्यालय परिसरात पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथले गरूड ॲडस् चे संस्थापक आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते गोविंद देशपांडे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ दरवर्षी देण्यात येणारा गोविंद सन्मान पुरस्कार यंदा ज्येष्ठ पशुवैद्यक डॉ. दिवाकर कुलकर्णी मांडाखळीकर यांना जाहीर झाला आहे. २८ मार्च रोजी होणाऱ्या ‘गोविंद देशपांडे स्मृति सोहळ्यात’ हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे. अकरा हजार रुपये, सन्मानपत्र आणि शाल असं या पुरस्काराचं स्वरुप आहे.

****